फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (१९७४ चा अधिनियम दोन)प्रकरण वीस अन्वये संपरीक्षा केलेला **२०१८** चा अविलंबित खटला अनुक्रमांक **०१** हा अभिलेख.
श्री. प्रि. म. पाटील न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी (कोर्ट नं.२), कळंब

१. अपराध घडल्याचा दिनांक ... .... २०.१२.२०१७

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक .... २०.१२.२०१७

३. फिर्यादीचे नांव,त्याच्या आई व बापाचे नांव,त्याचे वय व त्याचे निवासस्थान इ. .... महाराष्ट्र शासनातर्फे
पोलीस ठाणे, शिराढोण

४. आरोपीचे नांव,आरोपीच्या आई व बापाचे नांव ,त्याचे वय व त्याचे निवासस्थान इ. ....

**अशोक चंद्रकांत मोरे,**
वय २४ वर्षे, धंदा-मजुरी,
रा. शिराढोण, ता. कळंब,
जि. उस्मानाबाद.

५. अ) ज्याबददल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावुन सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील.

तुम्ही दिनांक २०.१२.२०१७ रोजी १९:१० वा. सुमारास शिराढोण, ता.कळंब, जि.उस्मानाबाद येथील जैन मंदिरासमोर मुंबई मटका नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना मिळून आलात. त्यामुळे तुम्ही मुंबई जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा केला.

६) आरोपी प्रतिकथन :- मला गुन्हा कबुल आहे.

-------------------------------

(आरोपीची सही)

स्वाक्षरीत/-
( **प्रि. म. पाटील** )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(कोर्ट नं.२), कळंब

दिनांक : ०१.०१.२०१८

## आ दे श

आज रोजी आरोपी सदर प्रकरणात न्यायालयासमोर हजर झाला. आरोपीने स्वत:हून गुन्हा कबूल केला, त्यामुळे आरोपी हा शिक्षेस पात्र आहे. शिक्षेबाबत न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले. आरोपीने सुरुवातीच्या पायरीला स्वत:हून गुन्हा कबुल करत आहे. त्यामुळे गुन्हयाचे स्वरुप, आरोपीचे वय, आरोपीची आर्थिक परिस्थिती व आरोपीचा गुन्हा कबुल करण्याबाबतचा प्रामाणिकपणा विचारात घेता खालील प्रमाणे आरोपीला शिक्षा देणे योग्य व संयुक्तिक वाटते. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपीला मुंबई जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी दोषी ठरविण्यात आले असून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये रक्कम रुपये ३००/- अक्षरी ( केवळ तिनशे रूपये) दंड व कोर्ट उठेपर्यंत शिक्षा देण्यात येत आहे, दंड न भरल्यास प्रत्येकी (०३) दिवसाची साधी कारावासाची शिक्षा देण्यात येत आहे.

२. अपील कालावधीनंतर जप्त मुद्देमाल रोख रक्कम रूपये ५२०/- (पाचशे वीस रूपये) सरकार जमा करण्यात यावी व इतर मुद्येमाल मुल्यहिन असल्याने नाश करण्यात यावा.

स्वाक्षरीत/-

( **प्रि. म. पाटील** )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(कोर्ट नं.२), कळंब

दिनांक : ०१.०१.२०१८